PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 4, ISSUE 4

# कृषीची कमी उत्पादकता कारणे व उपाययोजनांचे अध्ययन

**डॉ. नीता धर्माधिकारी**
**असोसिएट प्रोफेसर**
**जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इकॉनॉमिक्स**
**नागपूर (महाराष्ट्र) भारत**

**सारांश :**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्वाचे स्थान आहे तरी अन्य देशांच्या तुलनेत अवस्था वाईट आहे, उत्पादकता कमी आहे. ग्रामीण भागत ८०: जनता शेतीवर निर्भर आहे. शेती सहाय्यक जोडधंदेही तिथे आहे त्यावरही बहुतांश जनता निर्भर आहे. शेतीमध्ये जेवढया लोकांची आवश्यकता त्याच्या २५: अधिक लोक शेतीत काम करीत आहे म्हणून गरजेपेक्षा लोक जास्त अशी अवस्था झाली आहे. श्रम, भांडवल, अवजार ई. चा अभाव आहे. बी-बीयाणे निम्म प्रतीची, कर्जबजारीपणा, अपुरा पाणी पुरवठा, श्रमाचा अभाव, निसर्गाचा लहरीपणा, ई. मुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. मुसळधार पाऊस, वादळ, टोळधाड, या नैसगीक आपत्ती येतात. लोकसंख्येचा वाढता भार, शेतीजमिनीचे विभाजन, ई. समस्या आहेत. उत्पादकता कमी असल्याने ग्रामीण जनता दारिद्रांत जीवन जगताना दिसून येते. नापीक जमीन, जमिनीच्या धुपेशुळे हर वर्षाला साधारणतः २०: जमीन नापीक होते. भारतीय लोक अंधश्रध्देचा बळी पडतात. पिक नष्ट करणाऱ्या पशुपक्षी, किटकांनाही ते मारत नाही. भारतीय शेतकरी शेतीकडे उदारनिवाहाचे साधन म्हणून बघतात. पण शेतीच्या परिस्थितीत बदलायला कोणीच लवकर तयार होत नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हीच स्थिती होती, म्हणुन बाहेर पाडण्याकरीता सरकारने कृषी धोरण २००० जाहीर केले. या मंगल धोरणाचे अध्यन करण्याकरीता प्रस्तुत पेपर लिहण्यात आला आहे.

**मूळशब्द** :- अर्थव्यवस्था, कृषी, जीवननिर्वाह, कृषीधोरण.

**प्रस्तावना :-**

"भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व अनन्यसाधारण आहे". "भारतीय शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे-महात्मा गांधी"

भारतीय अर्थव्यवस्थेचा तो कणा आहे. ग्रामीण भागात अधिकतर लोकांचे उपजीविकेचे साधन शेती हे होय. शेतीमध्ये कोणत्याच सुधारणा न केल्या. लोकांच्या राहणमीमानाचा दर्जा खालावला होता.

स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी कृषी ही मागासलेल्या अवस्थेतेत होती. कृषी गुंतवणूकीचे प्रमाणही कमी होते. सिंचनव्यवस्थाही पर्याप्त नव्हती.

**उद्देश :-**

कृषीच्या स्थितीचा अभ्यास करणे उपाययोजनांचा अभ्यास करणे. क्षेत्राच्या समस्या, अध्ययन पध्दत हा पेपर दुय्युम स्थितवर दिला आहे.

१) **जमीनदारी पध्दती** :- ग्रामीण भागात जवळपास ५०ः कृषकांना सावकारांनवर अवलंबून राहावे लागते. जमीनदार जमिनी कर्जाच्या बदल्यात गहाण ठेवतात व पुढे त्यावर स्वतःच कब्जा मिळवतात. कर्जाचा भार, नापिकी या गर्तेत कृषक सापडतो. जमीनदार जास्त दराने व्याज आकारतात. शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचा ते पुरेपुर फायदा उठवितात.

२) **श्रमशक्ती कमी** :- शेतीवर राबणाऱ्या मजुरांचे प्रमाणही कमी झाले आहे. कारण शेतीवर काम करण्यास बरेच लोक उत्सुक नसतात. श्रमशक्ती अभावी उत्पादनेत वाढ करु शकत नाही. गावात कमी मोबदला मिळेल म्हणून ते शहराकडे वळतात. जमिन कसायला मजूर नसल्याने काम होत नाही. कामाचे स्वरूपही बदलले आहे. कर्ज घेतल्यावर जे परत करण्यासाठी त्यांच्या जवळ पर्याप्त पैसा नसतो. शेतकरी कर्जाच्या बोझ्याखाली दाबत जातो, व तो कृषी वाहण्यास असमर्थ ठरतो.

३) **जुनाट पध्दती** :- कृषी करण्याकरीता करण्यात जुनाट पध्दतीचा वापर केल्याने कृषीतून पाहिजे तसे पिक निघत नाही. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने उत्पादनात वाढ होईल पंरतू अजूनही आपल्या येथे परंपरागत आलटून पालटून पध्दतीनेच शेती वाहल्या जाते.

४) **पिकांमध्ये विविधता**:- कृषीकांनी शेतीवर विविध पिकं घेतली पाहिजे. त्यामुळे भूमीचा कस कायम राहिल. पण आपल्या इथे काही विशिष्ट पिकांचे उत्पादन घेण्यात येते, कारण ते वातावरण काही पिकांना लागते तसे नसल्याने पिकांतील विविधता साध्य करता येत नाही. यात उत्पादन घटकांची निम्न उत्पादन आहे.

५) **विषमता** :- ग्रामीण व शहरी गावाचा विकास पाहिजे तसा झाला नाही. संपत्तीचे वितरण समान व्हायला पाहिजे पण पंरतू संधी सर्वांना सारखीच मिळत नाही, म्हणुनच विषमता वाढत आहे. विकास फक्त विशिष्ट घटकांचा होतो.

६) **बेकारी** :- कृषीवर वर्षभर रोजगार मजुरांना मिळत नाही. कृषी मालकाला ही वर्षभर पुरेसे अन्नधान्य मिळत नाही. रोजगारही मिळत नाही. तरुणहाताला मनासारखे काम मिळत नाही. शेतीवरील

भार वाढण्याचे कारण वाढती लोकसंख्या होय. बेकारी ग्रामीण भागात पसरली आहे. बेकारी वाढल्याने उत्पन्न आहे व कृषीवर लावायला निधी नसतो किंवा अपूरा असतो.

७) **भुमीहिन शेतकरी** : काही शेतकऱ्यांजवळ शेतजमीन असूनही त्यांना दुसऱ्यांच्या शेतीवर काम करावे लागते. भूमिहीन शेतकरी गावात आहेत. त्यामुळे कृषीची स्थिती नाजुकच आहे. श्रम असूनही कसायला जमिन नसते.

८) **भांडवल** : कृषी क्षेत्राला मोठ्याप्रमाणात भांडवलाची गरज असली परंतू कमी भांडवल ही अवस्था निर्माण होते.

९) **नैसर्गीक आपत्ती** : पूर, दुष्काळ, अवर्षण सारखी परिस्थिती निर्माण झाली तर उत्पादनावर प्रभाव पडतो. पावसामध्ये सतत चढउतार हा होतच असतो. नैसर्गीक आपत्तीमुळे जोखीम निम्राण होते.

१०) **योग्यभाव नाही** : गरीबाकडे काही शेतकऱ्यांवजळ विक्री योग्य माल कमी असल्याने त्याला वाजवी भाव मिळत नाही.

**भूमी उत्पादक घटक** :-

१. **आकार** :- जमिनीच्या आकारावर भमीची उत्पादकता निर्भर आहे. आकार मोठा असेल तर उत्पादकता वाढेल व आकार छोटा असेल तर उत्पादकता कमी होईल. छोटे छोटे पट्टे असतात किंवा कुटुंबानुसार विघटन झालेले दिसते.

2. **जमिनीचा प्रकार** :- आपल्या प्रदेशात विविध प्रकारच्या जमिनी आहेत. काही अधिक उपजाऊ. तर काही मध्यम व काही नापीक, खडकाळ आहेत. सुपीक जमिनीवर उत्पादन जास्त घेतल्या जाईल. जमिनीच्या प्रकारावर शेतीच्या उत्पादनता दिसून येते.

3. **पाणी** :- कृषीकरीता पाणी हा घटक महत्वाचा आहे. पाणी पुरवठा सोयी मुबलक असतील उत्पादकता जास्त राहील तर कृषीला भरपूर पाणी लागते. पाण्याकरीता निर्सगावर अवलंबून राहावे लागते व ती लहरी आहे.

४. **प्रत्यय** :- प्रत्यय व्यवस्था पर्याप्त नाही. शेतकऱ्यांना प्रत्ययसाठी बरीच अवधी लागतो. प्रत्यय अभावी कृषी उत्पादकतेत घट होते. प्रत्यय प्राप्त करण्यासाठी गहाण ठेवण्याकरीता काहीच नसते.

५. **विपणन व्यवस्था** :- तयार माल बाजारपेठेपर्यंत आणण्याकरीता विभिन्न क्रिया कराव्या लागतात ते करताना बऱ्याचे अडचणी येतात. अकार्यक्षम विपणन व्यवस्थेमुळे उत्पादनाकरीता लागणारा कच्चा माल आणणे. बाहेरुन श्रमीकांना आणणे यात अडचणी येतात.

६. **संशोधन** :- आधुनिक शेतीद्वारे उपादकता वाढते, परंतू अजूनही पाहिजे तेवढे संशोधन आपल्याकडे झालेले नाही. कृषी विद्यापीठ झालेल्या संशोधनाची माहिती कृषकांना पाहिजे. कृषी मेळाव्याद्वारे असे मार्गदर्शनही होत नाही.

**शेतीची भूमिका** :-

१) **राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा** :- राष्ट्रीय उत्पन्नात ४० ते ५० टक्के भाग शेतीतून प्राप्त होतो. १९९३ मध्ये ते ३२: पर्यंत आला होता. परंतू आजही शेतीचे राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचे योगदान महत्वपूर्ण आहे.

२) **उदरनिर्वाहाचे स्त्रोत** :- ग्रामीण भारतात अधिकतर लोकांचे उदरनिर्वाचे साधन कृषी आहे. ग्रामीण जनता कृषीवर आधारित व्यवसायांवर आधारित असते.

३) **रोजगार** :- कृषी हा अर्थव्यवस्थेच्या कणा असल्याने कृषीवर आधारित ७०: जनता आहे. त्यामुळे या क्षेत्रात मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे.

४) **अन्नधान्याचे उपादन** :- लोकसंख्येपैकी ३/४ लोकसंख्या अन्नपुरवठा कृषीतून होतो. पशुपक्षयांना, जनावरांना आवश्यक चाराही शेतीतून प्राप्त होत असतो.

५) **किंमत स्थैर्य** :- जर अन्नधान्याच्या पुरवठयापैकी मागणी वाढली तर किंमती वाढतील. परंतू शेतीतून कच्चा माल प्राप्त होते त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढली तर किंमतीत स्थैर्य लाभते.

६) **कल्याणात वाढ** :- शेतीतून प्राप्त होणारे उत्पन्न वाढले तर ग्रामीण जनतेच्या कल्याणात वाढ होते. शेतकऱ्यांना धान्य अधिक मिळाल्याने ते सुखसोंयीचा लाभ घेऊ शकतात. त्याचप्रमाणे आरोग्य केंद्र, संदेशवहन, परिवहन, पाणी पुरवठा सोयी वाढल्याने सामाजिक कल्याणही वाढते.

७) **जमिनीचा उपयोग** :- देशाच्या एकूण ५३.८ टक्के जमीन शेती लागवडीखाली आहे. जमिनीचा पूर्ण उपयोग झाल्यास उत्पादकता वाढेल.

८) **बाजारपेठेचे विस्तार** :- उत्पादन व उत्पादकता यांचा विस्तार झाल्यामुळे बाजारपेठांचाही विस्तार होतो. उत्पादन वाढविण्यासाठी सुधारित बी-बियाणे, खत, यंत्र सामग्री इ. मागणी वाढते.

९) **आर्थिक विकास** :- आर्थिक विकासाकरीता राष्ट्रीय उत्पन्नात कृषीक्षेत्राचे योगदान महत्वाचे आहे. कृषीक्षेत्र व त्यावर आधारीत अन्य उद्योगांच्या विकासाला चालना देणे गरजेचे आहे. राष्ट्रीय भारताच्या अर्थव्यवस्थेचे ठळक गुणवैशिष्टये ग्रामीण हे आहे. ६९: जनता खेडेगावात राहते. (२०११ मध्ये) ६३: ग्रामीण लोकसंख्या कृषी व अन्य सहाय्यक व्यवसायाला कार्य करतात.

❖ नैसग्रिक संसाधने आणि पर्यावरणाची गुणवत्ता अखंड ठेवून विकास साधणे गरजेचे आहे.

**राष्ट्रीय कृषी धोरण** - जुलै २००० मधे भारत सरकार ने राष्ट्रीय कृषी धोरण जाहिर केले. जमिनी असलेली जैविक दबाव नियंत्रित करण्यासाठी व बिगर शेती उद्योगांसाठी उददेशासाठी जमिनीचे परिवर्तन करणे व शाश्वत विकास जमिन, पाणी, नैसर्गिक स्त्रोत, समाजाकडून स्विकृती राहील असे धोरण गरजेचे असते.

- कृषी क्षेत्रांचा वाढीच्या वार्षिक ४: अतिरिक्त दर
- साधन संपत्तीचा सक्षमपणे वापर करणारी आणि माती, पाणी व जैवविविधतची १७ व जागतीकीकरण उदारीकरणामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी निर्याती पासून जास्त फायदा मिळवून देणारी वाढ.

**वैशिष्टये** :- १) शाश्वत शेती २) अन्न आणि पोषण सुरक्षा ३) पशुसंवर्धन आणि मत्स्यपालन विकास ४) तंत्रज्ञानाची निर्मिती आणि हस्तांतरण ५) कच्च्या मालाचे व्यवस्थापन ६) शेतीसाठी प्रोत्साहन ७) शेतीमधे गुंतवणूक ८) संस्थात्मक रचना ९) जोखीम व्यवस्थापन १०) व्यवस्थापनातील सुधारणा (स्त्रोत :-भारत सरकार (२००२)

**कृषीची स्थिती धोरणांचा अभ्यास**

**१) पशुपालन आणि मत्स्यपालन विकास** :-

शेतीत विविधता आणणे, अन्नाच्या समुहामधे प्रथीनांची मात्रा वाढविणे, निर्वाणी निर्यातीकरता जास्तीत जास्त साठा निर्माण करणे याकरिता पशुसंवर्धन, कुक्कुट पालन, मत्स्य शेतीच्या विकासाला प्राधान्या देण्यात येईल. दूध मांस अंडी आणि पशुधन उत्पदनांच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी आणि शेतीच्या कामा साठी, वाहतुकी साठी, जनावरांची उपलब्धी वाढविण्यासाठी राष्ट्रीय पशुधन प्रजनन धोरण तयार करण्यात येइल.

२) **कच्चा माल व्यवस्थापन** :-बियाणे, खते, वनस्पती, संरक्षण-रसायने, जैविक किटकनाशक, शेती यंत्रसामुग्री आणि शेतकऱ्यांना वाजवी दरात कर्ज व कच्चा माल सरकारव्दारा पुरवठा करण्यात येईल. बी-बियाणे, मातीचा चाचणी घेवून दर्जा तपासला जाईल सेंद्रीय खते, जैव खतांच्या वापरास प्राधान्य दिले जाईल.

३) **शेतीसाठी प्रोत्साहन व गुंतवणूक-** शासनाव्दारे शेतकऱ्यांच्या स्वत:च्या गुंतवणूक वाढविण्यासाठी योग्य -वातावरणाची निर्मित केले जाईल कृषी क्षेत्राला जास्त सन्मान देण्यात येईल कृषी संशोधन मानव संसाधन विकास, आपली नंतरचे व्यवस्थापन आणि विपणनत्यात शेतीस खाजगी क्षेत्राव्दांरा गुंतवणूकीस प्रेरित करण्यास येईल.

४) **जोखीम व्यवस्थापन** :-तांत्रिक व आर्थिक पात्रता घेउनही-नैसर्गिक आपत्ती आणि भावांतील चढउतार त्यांच्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले. याकरीता राष्ट्रीय कृषी विमा योजना शेतकरी केंद्रीत राबवण्यात येणार होती.

भारतीय शेतीवर लहान शेतकऱ्यांचा एकाधिकार आहे. चांगल्या उत्पादनाचे लक्ष्य साधण्यासाठी संस्थात्मक सुधारणा योग्य दिशा देवून कृषीला बळकट केले जाईल.

**उपाय**

- सहकारी संस्थाबाबत राष्ट्रीय धोरण-
- मत्स्ययोद्योगा विकास धोरणे :-

प्रत्यक्ष कर्ज् एवं सिमांत कृषकांच्या व कृषी श्रमिकांना ऋण देणे.

- फसल ऋण योजना-
- बैलजोडी खरेदी करण्याकरिता कर्ज योजना (शेतीकरिता)
- गोबर गॅस प्लांट तयार करण्याकरिता कर्ज योजना

**पशुपालन संबंधी कर्ज** :-भारत सरकार व्दारे ग्रामीण क्षेत्रात पशुपालन संबंधीकर्ज देण्याची सुविधा दिली आहे.

- दुग्धविकास उद्देशाने पशु खरेदी करण्याची योजना
- बकरी पालन हेतु वित्तीय योजना
- कुक्कुट पालनाच्या उद्देशाने ऋण योजना

**अप्रत्यक्ष कृषिऋण** :-

- भारत सरकार सामान्यत: अप्रत्यक्ष कृषि ऋणसरकारी समितीच्या व्दारे देते. वर्तमान परिस्थितीमध्ये विभिन्न समितीव्दारा सर्वांना ऋण देणे.
- भाजीपाला व्यवसायाच्या उद्देशाने कमी
- धान्य किराणा दुकान
- पुत्राचे दागिने बनविणे.
- शासकीय रेशनिंग धान्य दुकान
- ग्रामीण खाद्य व्यापार योजना
- किसानकेंद्रीय कार्य

## निष्कर्ष :-

- २०१० एफएओ विश्व कृषी सांख्यिकी के नुसार भारतात कितीतरी ताजी फळ, भाज्यादूध, मसाले इ सर्वात मोठा उत्पादक ठरला.
- बाजरा, एरंडी तेलबिया, ज्यूट, इ. उत्पादक आहे.
- गहू आणि तांदूळ यामधे दुसरा नंबरचा उत्पादक आहे.
- सुखी फळ, वस्तू कृषी आधारीत कच्चे माल कंद, डाळ, मासे, नारळ, ऊस, भाज्या इ. बाबत दूसरा या तिसरा नंबरवर उत्पादक आहे.
- २०१० मे भारताचा जगात पॉंचवा स्थान आहे. ज्यानुसार सर्वात जास्त शेतपिकांचे उत्पादन केले. जसे की कापूस, कॉफी
- पशुधनात पाचवा नंबर २०११ च्या अहवालानुसार आहे.
- २००८ च्या मध्ये तांदूळ, गहू उत्पादन क्षमतेतपुढे आहे.
- भारताने मागील ६० वर्षात कृषविभागात बरेच यश हासील केले आहे.

## संदर्भग्रथं :-

१. ग्रामीण विकास तत्वे धोरण आणि व्यवस्थापन : कटार सिंह, अनिल शिशोदीया

- भारतीय अर्थव्यवस्था-डॉ. झामरे
- भारतीय अर्थव्यवस्था-डॉ. कानेटकर
- भारतीय अर्थव्यवस्था-डॉ. काकडे, डॉ. कावळे, डॉ. कायरकर
- भारतीय अर्थव्यवस्था-डॉ. सुधाकर शास्त्री, डॉ. देहलीवाल